# बृहन्मुंबई महानगरपालिका

## प्रमुख अधिकारी
## दुकाने व आस्थापना
## खात्याची कार्यसुची पुस्तिका
## सन 2023

किंमत रु. 300/-

प्रमुख अधिकारी, दुकाने व आस्थापना
यांचे कार्यालय, 5 वा मजला,
हॉकर्स प्लाझा इमारत,
सेनापती बापट मार्ग, दादर (प.)
मुंबई – 400 028.
दुरध्वनी क्र. 022-24311751.

## प्रस्तावना

1. दुकाने, वाणिज्यिक आस्थापना, निवासी हॉटेल्स, उपहारगृहे, थिएटरे, सार्वजनिक मनोरंजनाच्या किंवा करमणुकीच्या इतर जागा व इतर आस्थापना यातील कामाच्या व नोकरीच्या शर्तीचे विनियमन करण्याशी संबंधित असलेल्या कायद्याचे एकत्रिकरण करण्याकरिता आणि त्यात सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम 2017 अधिनियमीत केला आहे.

2.आधुनिक माहिती व तंत्रज्ञान यांमुळे व्यापार करण्याच्या पध्दतीत क्रांती घडून आली असून, त्यामुळे वस्तु व सेवांची ऑनलाईन विक्री करणेही कोणत्याही प्राकृतिक व भौगोलिक मर्यादांशिवाय व 24 तास उपलब्ध असल्यामुळे वेळेच्या मर्यादेशिवाय शक्य झाले आहे. ऑफलाईन धंद्यास ऑनलाईन धंद्याबरोबर स्पर्धा करण्यासाठी समांतर व्यासपिठाची तरतूद करणे आणि 24 तासांकरीता व आठवड्यातील सर्व दिवसांसाठी दुकाने व आस्थापना चालू ठेवण्यासाठी परवानगी देणे आवश्यक ठरते. यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मीती होण्यास आणि स्थुल देशांतर्गत उत्पन्नात वाढ होण्यास मदत होईल.

3. शासनाचे "उद्योगव्यवसाय सुलभिकरण धोरण" या धर्तीवर, दहा कर्मचा-याहून कमी कर्मचारी असणा-या अति लहान आस्थापनांना अधिनियमाखालील नोंदणीतून मुक्त ठेवण्याची आणि स्वयं-घोषणापत्र व स्वयं-प्रमाणित कागदपत्रांवर आधारित, अधिनियमान्वये सर्व सेवा ऑनलाईन देण्याची गरज आहे. दुकाने व आस्थापना यांतील कर्मचा-यासाठी एकरुप कामाच्या शर्ती असणेदेखील आवश्यक आहे. कर्मचा-यांना सर्व कल्याणकारी उपाययोजना लागू करण्यात यावी, जेणेकरुन त्यांचे आरोग्य आणि स्वास्थ्य यात सुधारणा होऊन त्यांच्या उत्पादक क्षमतेत वाढ होईल. तसेच महिलांच्या साक्षरता टक्केवारीत वाढ झाल्यामुळे महिला कर्मचा-यांसाठी नोक-या व रोजगाराचे पुष्कळ मार्ग उपलब्ध झाले आहेत. महिलांना, विशेषत: त्यांचे आरोग्य, सुरक्षितता व आदर यासंबंधीच्या विवक्षित वाजवी अटी व शर्ती यांस अधिन राहून, पुरुष कर्मचा-यांसारखे रात्रपाळीत काम करण्याची परवानगी दिल्याने त्यांच्या अर्थाजन क्षमतेत वाढ होईल व परिणामी त्यांचे सबलीकरण होईल.

4. केंद्र सरकारनेदेखील सविस्तर विमर्श व विचारविनीमय केल्यानंतर ज्यास अंतिम रुप दिलेले आहे, असे आदर्श दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) विधेयक 2017 सर्व राज्य शासनांना विचारार्थ प्रसृत केले होते.

5. वरील सर्व बाबी लक्षात घेता, महाराष्ट्र शासनास **महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम 1948 निरसीत करुन, (विविध आस्थापनांतील नोकरीच्या शर्तीचे आणि त्यात नोकरीवर ठेवलेल्या कर्मचा-यांच्या सेवेच्या इतर शर्तीचे विनियमन करण्यासाठी)** केंद्र सरकारने प्रसृत केलेल्या आदर्श विधेयकाच्या धर्तीवर, एक नवीन कायदा अधिनियमीत करणे इष्ट वाटल्यामुळे महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम 2017 हा दि. 19.12.2017 पासून अंमलात आलेला आहे.

6. महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी ठरवून दिल्याप्रमाणे इतर कामगार कायद्याची अंमलबजावणी करणे.

7. प्रतिबंधीत प्लास्टिक पिशव्यांचे काम महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियत्रंण) अधिनियम, 2006 व महाराष्ट्र प्लास्टिक कॅरीबॅग्ज (उत्पादन व वापर) नियम 2006, व महाराष्ट्र प्लास्टिक व थर्माकॉल अविघटनशील वस्तूचे (उत्पादन,वापर,विक्री,वाहतूक,हाताळणी, साठवणूक) अधिसुचना 2018 व प्लास्टिक कचरा प्रबंधन (सुधारित) नियम 2021 च्या अनुषंगाने प्रमुख अधिकारी, दुकाने व आस्थापना खात्याकडे सोपविण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे दुकाने व आस्थापना खात्याकडून कारवाई करण्यात येते.